मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,नागपूर विभाग,नागपूर

जा.क्र./प्रस्तुत/जिल्हाधिकारी/कावि 714 /२०१६
रामाक्र - १४७/एनएपी-३४/२०१५-१६
जिल्हाधिकारी, यांचे कार्यालय,नागपूर
दिनांक 24 जून २०१६

**परिशिष्ट "ब"**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ४२ —अ मधील तरतुदीन्वाये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे,अश्या जमीनीच्या भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमुना,**

ज्याअर्थी, जिल्हा नागपूर तालुका नागपूर ग्रामिण गांव जामठा च्या खसरा क्रमांक-२१८/प.हं.नं.-४२/गट क्रमांक/न.भू.क्रामांक एकूण क्षेत्रफळ ३०८०० चौ.मिटर या जमिनीच्या तरतुदीन्वये **रहिवासी** /वाणिज्य/औद्योगिक अकृषक प्रयोजनासाठी सदर जमिनिचा विकास करण्यास नागपूर सुधार प्रन्यास, मेट्रो विभाग, नागपूर या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश जा.क्र का.अभि.(मेट्रो)स.अभि.-१/५३३३ दिनांक ०६.०६.२०१६ अन्वये विकास / बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यास क्षेत्राचे विवरण खालील प्रामाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Area Land Area as per 7/12 | :- | 30800. 00 Sq.M |
| 2 | Area Under Land K prat | :- | 30800.001hec |
| 3 | Gross Area Under Layout | :- | 14163.89Sq.M |
| 4 | Area Under open Space | :- | 1416.453Sq.m |
| 5 | Area Under Amenity Space | :- | 1416.688 Sq.M |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Total land Under Approach road | :- | 2531.326Sq.M. |
| 7 | Area Under Service Road | :- | 467.644Sq.M |
| 8 | Area Under Residential plot | :- | 8331.779 Sq.M |
| 9 | Total Land Under layout | :- | 14136.89 Sq.M |

ज्याअर्थी,उक्त जमिनीच्या भोगवटदाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतर कराची व वर नमुद **निवासी** अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी अकाराणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यांत येते. एकूण क्षेत्र ३०८०० चौ.मि.पैकी आकारणी करावयाचे क्षेत्र ९७४८.२३२ चौ मिटरला १५ पैसे प्रति चौ. मिटर याप्रमाणे अकृषक करावयाचे क्षेत्रावर अकृषक सारा रूपये १४६३/- ग्रामपंचायत सेस सारा अकृषक सा-या ऐवढा रु १४६३/- जिल्हा परिषद सेस सारा अकृषक सा-याचे ७ पट१०२४१/-व परावर्तीत सारा अकृषक सा-याचे ५ पट म्हणजेच रुपये ७३१५/- असे एकूण रुपये २०४८२/- निश्चित होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार आणि खालील शर्तीना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकरणच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यांत येत आहे.

१) आकारणी :- उक्त जमिनीच्या भोगवटदार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसूली योग्या ब असलेल्या आकराऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक ३१ जूलै २०१७ (वर्ष) रोजी संपणा-या हमीच्या

कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये १४६३/- (रु एक हजार त्रेसष्टा ) फक्त या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी-यांकडून, वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अश्या सुधारित आकरणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर दर आणि उपकर भरील.

३) वरील प्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहील.

४) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लघंन केल्यास जिल्हाधिका-यास उक्त संहितेच्या आणि तदन्वाये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीन्वाये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने,त्यास योग्य वाटेल एवढा इंड भरल्यानंतर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालू ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणून नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी या ठिकाणी महाराष्ट्रचे राज्यापाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे.

आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक २४ जून २०१६ रोजी त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)

-------------------- 2/6/2016

श्री अभिमन्यु मारोतराव ढगे

(साक्षीदरांच्या स्वाक्ष-या व पदनाम)

अ)-----------------------------

श्री-- Pawan Raviprasad Gupta

ब) -----------------------------

श्री Girdhari Mulchand Kawar

(साक्षीदरांच्या स्वाक्ष-या व पदनामे)

अ)-----------------------------

श्री-- Pawan Raviprasad Gupta

ब)-----------------------------

श्री-- Girdhari Mulchand Kawar

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: श्री श्री अभिमन्यु मारोतराव ढगे म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. ती अ.अ. ही व्यक्ती ,तीच व्यक्ती आणि त्याने या ठिकणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

सचिन कुर्वे
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रातिलीपी :-

१) कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रान्यास (मेट्रो) नागपूर यांना माहिती करिता अग्रेषित.

२) तहसिलदार नागपूर ग्रामिण यांना माहिती तथा आवश्याक कार्यवाही करिता

३) तलाठी-नागपूर ग्रामिण यांना कार्यवाही करीता

४) श्री.अभिमन्यु मारोतराव ढगे भूखंड क्रमांक-४ गाळा क्रमांक-२ कोस्टाल अपार्टमेंट,खामला रोड नागपूर यांचा उपरोक्ता अटी व शर्ती चे अधिन राहून पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषक कराची रुपये २०४८२/- रक्कम चालानच्या स्वरुपात शासनजमा करण्यासाठी अग्रेषित.

सचिन कुर्वे
जिल्हाधिकारी, नागपूर